Ratnagiri Times 11/03/2021

# मुकुल माधव फाउंडेशन रेणुका माता नागा लेडीज वसतिगृहाला मासिक किराणा देणार




रत्नागिरी, १० मार्च (वार्ताहर) चिपळूण तालुक्यात रेणुका 'माता नागा लेडीज वसतिगृह असून- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती हा प्रकल्प चालवत आहेत. यांमध्ये भारताच्या ईशान्येकडील भागातील मुलींना चिपळूण येथे आणून त्यांना या प्रकल्पांतर्गत शिक्षण, वसतिगृह,भोजन यांची सोय केली जाते. याचा उद्देश त्या भागातील धर्मांतर,स्थानिक संस्कृती आणि आदिवासींच्या कलांच्या संरक्षणासाठी स्थापन करण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून मुकुल माधव फॅंडिशन व फिनोलेक्स कंपनी यांच्याकडून या प्रकल्पांतर्गत मणिपूर आणि नागालॅंडमधील १८ मुलींसाठीचा किराणा खर्च उचलला असून चिपळूण येथे रेणुका माता नागा वसतिगृहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. ९ मार्च रोजी श्रीमती. सुरेखा खेराडे, नगराध्यक्ष चिपळूण आणि डॉ. ज्योती यादव; तालुका आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते झाले. महिला सप्ताह उत्सवाचा एक भाग म्हणून या प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले होते.. तसेच मंदार लेले, सचिव आणि प्राजक्ता ओक समन्वयक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राष्ट्रीय सेविका समितीच्या स्वयंसेवक, गोखले, नगरसेविका चिपळूण आणि नागालॅंड व मणिपूर येथील विद्यार्थिनी या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

या प्रकल्पामुळे नागालॅंड आणि मणिपूरमधील १८ मुलींना त्यांच्या रोजच्या आहारातील गरजा भागविल्या जातील. श्रीमती खेराडे आणि डॉ. ज्योती यादव यांनी किराणा देण्याच्या या उदार देणगीचे मुकुल माधव फॅंडिशन व फिनोलेक्स कंपनीचे कौतुक केले.